# पाहा 'जलपरी' आणि 'छोटा सिपाही'

▶▶ पुणे टाइम्स टीम

त्रिओस प्लाझाच्या वतीनं 'लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. हा महोत्सव १ ते ३ सप्टेंबर दरम्यान लोणावळ्यातील आयएनएस शिवाजी रोडवरील रायवूड्स इथल्या त्रिओस प्लाझा इथं होणार आहे.


आय ॲम कलाम


जलपरी : द डेझर्ट मरमेड

या महोत्सवात हिंदी व इंग्रजी भाषेतील ३२ सिनेमे दाखवले जाणार असून, माधव तोडी महोत्सवाचे संचालक आहेत. महोत्सवाची सुरुवात 'हम साथ साथ है' या सिनेमानं होणार असून, लहान मुलांसाठी 'हॅप्पी मदर्स डे' हा सिनेमा दाखवला जाणार आहे. दोन स्वतंत्र स्क्रीन्सवर या दोन सिनेमांनी महोत्सवाचं उद्घाटन होईल. 'भीष्म पितामह' व 'शक्तीमान' या भूमिकांसाठी प्रसिद्ध असणारे व चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष अभिनेता मुकेश खन्ना महोत्सवास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

हर्ष मायर या अभिनेत्याला ज्या सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट बालकलाकार म्हणून राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, तो नीला मदहाब पांडा दिग्दर्शित 'आय एम कलाम', 'अंदाज अपना अपना', 'हम आपके हैं कौन' यांसारख्या सिनेमांसह 'जलपरी : द डेझर्ट मरमेड', 'स्वर्ग', 'छोटा सिपाही', 'रसेल मॅडनेस', 'मंकी अप', 'द गोल', 'माय लकी एलिफंट' हे सिनेमेही दाखवले जाणार आहेत. महोत्सवातील सिनेमांच्या माध्यमातून लहान मुलांना कौटुंबिक व नैतिक मूल्यं लक्षात यावीत, या दृष्टीनं लोणावळ्यातील सरकारी, खासगी शाळा, स्वयंसेवी संस्था व अनाथाश्रमातील मुलांना इथं मोफत सिनेमे दाखवले जाणार आहेत.